॥ ॐ ॥

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त

डिसेंबर २०२१

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org

# कै. कृष्णाजी लक्ष्मण पटवर्धन

## संस्थापक - 'स्व'-रूपवर्धिनी

जन्मतिथी : दत्तजयंती, जन्म दिनांक : २५ डिसेंबर, १९२०



व्यक्ती व्यक्ती में जगाये, राष्ट्रचेतना ।
जन मन संस्कार करे यही साधना ।
साधना नित्य साधना ।
साधना अखंड साधना ॥धृ.॥

विजयशाली संघबद्ध कार्यशक्ती दे ।
तीव्र और अखंड ध्येयनिष्ठा हमको दे ।
स्वराष्ट्र धर्म रक्षणार्थ वीरव्रत स्फुरे ।
तव कृपासे हो सफल हमारी साधना ॥

## युवा विभाग



◆ **निर्माण शाखा :** ११ वी, १२ वी अभ्यासवर्ग-दि. २८ नोव्हेंबर रोजी निर्माण गटातील ३० युवकांचा एकदिवसीय अभ्यास वर्ग घेण्यात आला. या अभ्यास वर्गातील मुख्य विषय 'जीवित ध्येय म्हणजे काय? आणि वर्धिनीचे काम', यावर या अभ्यास वर्गात पुढील वक्त्यांनी विषय मांडणी केली.

| वक्ता-विषय | मुद्दे |
|---|---|
| १) श्री. निशिकांत वाईकर माझी कारकीर्द आणि शाखा जीवन. | * महाविद्यालयीन जीवनात अभ्यास व शाखा काम यांची घातलेली सांगड.<br>* जबाबदारी व आव्हानांचा स्वीकार करत येणाऱ्या अनुभवातून शिकत जाण्याचा स्वभाव. |
| २) श्री. कृष्णा वरपे माझा जीवन प्रवास. | * कधीही न्यूनगंड न बाळगता आपल्या योग्य निर्णयावर ठाम रहा.<br>* कोणतेही काम करायला लाजू नका.<br>* प्रत्येक गोष्टीचा मोबदला हा पैसे नसून काही गोष्टींचा मोबदला हा अनुभव असू शकतो. |
| ३) श्री. सतिश गेंगरे जीवित ध्येय. | * ध्येय निश्चित करणे व त्याला अनुसरून प्रयत्न करणे.<br>* परिस्थिती कसलीही असली तरी चालेल आपल्या कष्टांनी त्यावर मार्ग काढणे.<br>* प्रत्येक गोष्टीचे सूक्ष्म नियोजन करणे. |
| ४) श्री. सुरेश पवार अभ्यासाचे नियोजन | पीपीटीद्वारे अभ्यासाचे नियोजन कसे करावे ? याची मांडणी करून युवकांकडून त्याचे वैयक्तिक नियोजन करून घेतले. |
| ५) श्री. शिवाजी खरात | समारोप सत्र. |

जीवितध्येय आणि वर्धिनीच्या कामाचा आयुष्यावर होणारा सकारात्मक परिणाम याबाबतचे सार सांगून अकरावी-बारावी हे काहीतरी नवीन करण्याचे वय असते, अनेक कल्पना या वयामध्ये सुचत असतात आणि या कल्पना प्रत्यक्षात राबवण्यासाठी आपण आत्तापासूनच तयारी केली पाहिजे असे त्यांनी सांगितले.





## AWAM दिवाळी विशेष उपक्रम




दि. १४ नोव्हेंबर २०२१ ला AWAM गटाने दिवाळी फराळ आणि गप्पा या कार्यक्रमात निसर्गाला सोबत घेऊन अनेक वर्ष व्यवसाय करणाऱ्या दोन कार्यकर्त्यांना निमंत्रित केले होते. सगुणाबाग ॲग्रो टुरिझमचे संचालक श्री. चंदन भडसावळे आणि अंजनवेल ॲग्रो टुरिझमचे संचालक आणि वर्धिनीचे युवा कार्यकर्ते श्री. राहुल जगताप या दोन युवा व्यावसायिकांच्या अनुभवातून त्याचा कष्टमय आणि यशस्वी प्रवास गप्पांच्या मैफिलीतून उलगडला गेला. सदर कार्यक्रमाला कार्यरत युवा गट, व्यावसायिक कार्यकर्ते, विशेष निमंत्रित हे सर्वजण उपस्थित होते.



श्री. चंदन भडसावळे



श्री. राहुल जगताप

## शाखा विभाग



◆ **राजर्षी शाहू महाराज शाखा** - संविधान दिन विशेष - दि. २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनानिमित्त शाहू आणि सुबोधानंद या दोन्ही शाखांनी मिळून 'संविधानाचे महत्त्व' या विषयावर श्री. सुरेश पवार यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले. बाल दिनानिमित्त राजर्षी शाहू शाखेची १८ जणांची सायकल सहल सिंहगडावर



काढण्यात आली. राजे शिवराय प्रतिष्ठानतर्फे प्रतिदिन होणाऱ्या तानाजी मालुसरे यांच्या पुतळ्याचे पूजन या दिवशी शाखेने केले.

◆ **स्वामी दयानंद सरस्वती शाखा** - बालदिन विशेष - बाल साहित्य ई-संमेलन २०२१ - शाखेत विविध उपक्रम घेण्यात आले. त्यामध्ये ५ वी - ६ वी गटाला पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्यावर आधारित पोस्टर तयार करणे, ७ वी - ८ वी गटाला पंडीत जवाहरलाल नेहरूंच्या जीवनातल्या काही कथा, कविता सादरीकरण करणे तर ९ वी - १० वी च्या गटाला पंडीत नेहरू यांच्या जीवनावर एकपात्री नाटक सादरीकरण करणे अशा कार्यक्रमातून मुलांचा उत्साह वाढला.

◆ **धर्मवीर शंभूराजे शाखा** - मागील एका महिन्यापासून शाखेतील उपस्थिती ५० ते ५५ असून मैदान समिती, कार्यक्रम समिती अतिशय उत्तम कार्यरत आहे. शाखेच्या पालक सभेला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. वर्धक आणि युवक यामधील नाते घट्ट व्हावे आणि शाखा कामासाठी उर्जा आणि प्रेरणा मिळावी यासाठी शाखेच्या सिंहगड सहलीत ५६ जणांनी सहभाग घेतला. नियमित साप्ताहिक बैठका, मानसिक विकास बैठक, नियोजनबद्ध संपर्क रचना, प्रगती पालक - पाल्य दृढ होणारे नाते, निवासी वर्गांची रेलचेल या भरलेल्या वातवरणात शाखा काम फुलत आहे.

◆ **स्वामी ब्रह्मानंद शाखा** - काल दि. ९ नोव्हेंबर रोजी शाखेतील मोठा गट आणि युवक यांनी नवीन मराठी शाळेत इतिहास प्रेमी मंडळाला भेट दिली. मंडळाने सादर केलेल्या 'पानिपतचा रणसंग्राम' हे प्रदर्शन पाहिले. हाच उपक्रम समर्थ रामकृष्ण शाखेनेही केला.

बाल दिनानिमित्त शाखेतील लहान गटाने प्रक्रिया आणि जिवीत नदी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक **विशेष प्रक्रिया - वाचन कट्टा** या कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला. तिथे आदिती ताईंनी स्वतः लिहिलेले 'गोष्ट तशी अलीकडची' या पुस्तकाचे वाचन केले. त्यामध्ये विठ्ठलवाडी नदीच्या पात्रात कोणकोणते पक्षी आढळतात,



रांजण खळगे कसे तयार होतात हे मुलांना सांगितले. ताईंनी व त्यांच्या गटाने विठ्ठलवाडी नदीच्या पात्रात व परिसरात केलेल्या कामाची मांडणी



गोष्टी स्वरूपात मांडली आहे. कार्यक्रमाच्या शेवटी सगळ्यांनी आम्ही नदी स्वच्छ ठेवू, तिला घाण करणार नाही आणि करू देणार नाही अशी प्रतिज्ञा घेतली. शाखेतील मोठ्या गटाला तळजाई टेकडीवर नेण्यात आले.


◆ **स्वामी श्रद्धानंद शाखा** – शाखा घोरपडे उद्यानात भरत होती. खेळ मस्त होत होता परंतु तासिका आणि कार्यक्रमासाठी पुरेशी जागा आणि वातावरण ठीक नव्हतं. त्यामुळे अडचण होत होती. परंतु आता तसे नाही. गेले ४ दिवस शाखा नियमित ठिकाणी भरायला लागली. मुलांना जो उत्साह आपण खूप वेळाने आपण आपल्या नेहमीच्या ठिकाणी आलो तो मस्तच होता. जेव्हा एकत्रित ३० मुले शाळेत शिरली तेव्हा सर्वांनी 'भारतमाता की जय' अशी घोषणा देऊन प्रवेश केला. त्यानंतर दणदणीत शाखा भरवून फुटबॉल खेळ झाला. मग त्यानंतर मुलांना पहिल्या दिवशी शाखेत येऊन कसे वाटले हे परिपाठात विचारले. मग केतन दादाने सर्व मुलांसाठी आणि युवकांसाठी सांकेतिक भाषा स्पर्धा घेतली. ज्यात मुलांचा खूप चांगला प्रतिसाद होता. असेच गेले ४ दिवस छान कार्यक्रम होत आहेत.

## पाकोळी बालवाडी

दिवाळीची तयारी म्हणून नोव्हेंबर महिन्यात अभ्यासाच्या पाठांबरोबर पणती रंगवणे, रांगोळीत रंग भरणे, आकाशकंदील तयार करणे हे कृतिशील पाठ घेतले. दिवाळीच्या प्रत्येक दिवशी वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा, भाऊबीज या सणांची माहिती पालक गटावर शिक्षिकांनी पाठवली. घरच्या दिवाळीचे मुलांनी फोटो, व्हिडियो पाठवून उत्तम प्रतिसाद दिला. दिवाळीची सुट्टी संपल्यावर झालेल्या ऑनलाईन शाळेत दिवाळीच्या गमतीजमती मुलांनी ताईंना सांगितल्या. दर गुरुवार व शनिवार दोन तासांची ऑनलाईन शाळा असते. त्यात गोष्टी, अभिनय गीते, बडबड गीते, चुरगळा काम, कांद्याचे ठसे काम, कारागिरांचा परिचय, प्राण्यांची घरे, मूळ रंग यांचे पाठ झाले. मुलांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.







## महिला विभाग



◆ **रुग्ण सहाय्यक वर्ग** – पुणे वर्गातील विद्यार्थिनींचे के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये १६ नोव्हेंबरपासून व माले वर्गाचे २२ नोव्हेंबरपासून पिरंगुट व घोटावडे फाटा येथील हॉस्पिटलमध्ये प्रॅक्टीकल सुरू झाले. प्रत्यक्ष कामाचा अनुभव मुलींचा आत्मविश्वास, संवाद कौशल्य वाढवते. तसेच दोन्ही वर्गांमध्ये 'न्यूट्रीशन लॅब' हा उपक्रम झाला. मुलींनी वेगवेगळे पौष्टिक पदार्थ



स्वतः बनवले व त्याची माहिती परीक्षकांना सांगितली. माजी शिक्षिका सौ. कुंदाताई जोशी व अतिषा भोसले



परीक्षक म्हणून सहभागी झाले होते.

◆ **मुलींचे काही विशेष अनुभव –**
* रुपाली मोहिते – माले वर्ग – श्री गणेश हॉस्पिटल, घोटावडे – प्रथमच मी पेशंटचे ड्रेसिंग केले. सिनियर सिस्टरबरोबर ऑपरेशन थिएटरमध्ये तयारी केली. नवीन साधनांची नावे व उपयोग माहीत झाला. * रसिका माने – माले वर्ग – श्रीकृपा हॉस्पिटल, घोटावडे फाटा – पहिल्याच आठवड्यात सिझेरियन बघायला मिळाले. या पद्धतीने बाळ जन्माला आणताना खूप काळजी घ्यावी लागते. डॉक्टरांकडून काही गोष्टी स्पष्ट होत होत्या आणि मला यातून कामाची जबाबदारी लक्षात आली. * निलिशा गोठे (पुणे वर्ग) – के. ई. एम. हॉस्पिटल – फिमेल मेडिकल वॉर्डमध्ये अर्धांगवायू झालेल्या आजींचं स्पंज बाथ केला. त्यांना डाव हात व पाय हलवता येत नव्हता. पण खूप काळजी घेऊन केलेले काम त्यांना आवडले. त्यांनी माझ्या हातावरून हात फिरवला तेव्हा त्यांची कौतुकाची भावना मला जाणवली. हा अनुभव माझ्या कायम लक्षात राहील.





## स्पर्धा परीक्षा केंद्र

◆ **वंचित घटकांची दिवाळी** – केंद्रातील व अभ्यासिकांमधील विद्यार्थी परीक्षांच्या वेळापत्रकामुळे दिवाळीला घरी जाऊ शकत नाहीत. सामाजिक भान जपत हे विद्यार्थी दरवर्षी दिवाळी विधायक रीतीने साजरी करतात. ऋतुजा धंगेकर अभ्यासिकेमध्ये पालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांबरोबर दिवाळी फराळ असा कार्यक्रम झाला. याचबरोबर मुलांनी विविध कविता, गझल, गाणी, कथा, शेरोशायरी यांचे सादरीकरण करून कार्यक्रमाला रंगत आणली. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आवाहनाला सर्वांनी कचऱ्याचे नेहमी वर्गीकरण करू, परिसर स्वच्छ ठेवू अशी शपथ घेऊन साथ दिली.

◆ **शुभेच्छा समारंभ** – केंद्रातील व अभ्यासिकेतील २५ पेक्षा जास्त विद्यार्थी राज्यसेवेच्या मुख्य परीक्षेच्या अ व ब वर्गातील १७ पदांसाठी पात्र ठरले आहेत. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी DYSP श्री. प्रनिल गिल्डा सर दि. २ डिसेंबरच्या कार्यक्रमात उपस्थित होते. ते म्हणाले, "सर्वांनी शांतचित्ताने, आत्मविश्वासाने, काळजीपूर्वक परीक्षेला सामोरे जा. ही परीक्षा आपल्या जीवनात बदलाची संधी आहे. रोजच्या अभ्यासाबरोबर व्यायाम आणि आहार यांचे संतुलन राखा. आपली मानसिक व शारीरिक शक्ती यामुळे टिकून राहते. त्याकडे

दुर्लक्ष करू नका.''

◆ **संविधान दिन** - २६ नोव्हेंबर - कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधान उद्देशिका वाचनाने झाली. या दिनाचे महत्त्व श्री. निलेश धायरकर सरांनी सांगितले व नंतर '२०० हल्ला हो' या सत्य घटनेवर आधारित चित्रपटाचे प्रसारण व चर्चा झाली. काही वेळा प्रशासनातील अधिकारी अधिकारांची योग्य रीतीने अंमलबजावणी करत नाहीत. त्यामुळे समाजातल्या काही घटकांना त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. प्रशासनामध्ये कुणावरही अन्याय न होता चांगले काम करण्याची प्रेरणा यातून मिळाली.





***